# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम./माध्य.परीक्षा/ 2213
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -२९/१२/२०२१ 30

.प्रति,

मुख्याध्यापक ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- इयत्ता १० वी जलसुरक्षा या अनिवार्य विषयाच्या मुल्यमापन योजनेबाबत..**
संदर्भ :- राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं./पापुअ/७१३९ दि.२४/१२/२०२१ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन इयत्ता १०वी जलसुरक्षा या अनिवार्य श्रेणी विषयाची मुल्यमापन योजना मंडळाच्या www.mahahsscboard.in वेबसाईटवरही टाकण्यात आले आहेत. सदर मूल्यमापन तक्ते व आराखडे या पत्रासोबत जोडलेले आहेत त्यानुसार आपण आवश्यक ती कार्यवाही करावी.

(सत्यवान डी.सोनवणे),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - वरीलप्रमाणे आराखडे

दु.क्र.०२० २४४७६९३८
Email-curriculumdept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

## इयत्ता १० वी जलसुरक्षा

## मूल्यमापन योजना

जलसुरक्षा हा विषय इयत्ता १० वी साठी अनिवार्य श्रेणी विषय म्हणून निर्धारित करण्यात आलेला आहे. या विषयाची मांडणी ही पाठ्यपुस्तक व कार्यपुस्तिका (उपक्रम व प्रकल्प नोंदवही ) अशा स्वरूपात करण्यात आलेली आहे. त्यानुसार पाठ्यपुस्तकामध्ये जलशिक्षण, जलसंधारण, जलव्यवस्थापन व जलगुणवत्ता या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. तर कार्यपुस्तिकेमध्ये चार प्रमुख घटकांवर आधारित विद्यार्थ्यांनी करावयाच्या सर्व कृती, उपक्रम आणि प्रकल्पांचा समावेश आहे. त्याविषयी सूचना आणि मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. या विषयाच्या संपूर्ण अध्ययनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कृती, उपक्रम आणि प्रकल्प यांचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलप्रमाणे मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे.

| अ.न. | तपशील | प्रथम सत्र | द्वितीय सत्र | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | उपक्रम | घटक १ मधील कोणताही १ | घटक ३ मधील कोणताही १ | ४० |
| | | घटक २ मधील कोणताही १ | घटक ४ मधील कोणताही १ | |
| | | प्रत्येकी १० गुण प्रमाणे एकूण २० गुण | प्रत्येकी १० गुण प्रमाणे एकूण २० गुण | |
| २ | प्रकल्प | घटक १ व २ मधील कोणताही १ | घटक ३ व ४ मधील कोणताही १ | ३० |
| | | १५ गुण | १५ गुण | |
| ३ | तोंडी/लेखी परीक्षा | घटक १ व २ च्या आशयावर आधारित प्रश्नांचा समावेश १० गुण | घटक ३ व ४ च्या आशयावर आधारित प्रश्नांचा समावेश १० गुण | २० |
| ४ | उपक्रम व प्रकल्प नोंदवही | घटक १, २, ३ व ४ वर आधारित उपक्रम व प्रकल्प अहवाल लेखन पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारतीची जलसुरक्षा कार्यपुस्तिकेची पूर्तता | | १० |
| जलसुरक्षा विषयाचे एकूण मूल्यमापन | | | | १०० |
| श्रेणी | | | | |

१. सत्रनिहाय जलसुरक्षा विषयाच्या मूल्यमापन नोंदी कराव्यात.

२. उपक्रम व प्रकल्प नोंदवही मूल्यमापन संदर्भात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने निर्धारित केलेली जलसुरक्षा कार्यपुस्तिका (उपक्रम व प्रकल्प नोंदवही ) शैक्षणिक वर्षाच्या शेवटी

जमा करून घ्यावी.

३. उपरोक्तप्रमाणे एकूण १०० गुणांपैकी प्राप्त गुणांचे श्रेणीत रुपांतर करण्यात येईल.

४. अ, ब , क श्रेणी उत्तीर्णता तर ड श्रेणी अनुत्तीर्णता दर्शवेल.

(अ श्रेणी - ६० ते १०० गुण, ब श्रेणी - ४५ ते ५९ गुण, क श्रेणी - ३५ ते ४४ गुण, ड श्रेणी - ० ते ३४ गुण)

(एम. डी. सिंह)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे